# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः22.02.2025 वारःशनिवार

---

1. भाषेतील अडथळे दूर करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असली पाहिजे; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज महाराष्ट्रातल्या छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर
3. गृह मंत्रालयाच्या पश्चिम विभागीय परिषदेची 27 वी बैठक केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज पुण्यात होणार
4. सोलच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पातळीवर नाव कमावणारं नेतृत्त्व तयार होईल, असा पंतप्रधानांचा विश्वास आणि
5. जी-20 ने आपलं नेतृत्व टिकवून ठेवण्यासाठी संपूर्ण जागतिक आव्हानांना अचूकपणे प्रतिबिंबित करण्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांचं आवाहन

**<u>साहित्य संमेलन</u>**

भाषेतील अडथळे दूर करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असली पाहिजे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन काल नवी दिल्लीत विज्ञान भवन इथे पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. भाषा केवळ संवादाचं माध्यम नसून ती संस्कृतीची संवाहक असते; मराठी भाषेने महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील अनेक महापुरूषांच्या विचारांना अभिव्यक्ती देऊन सांस्कृतिक निर्माणाचं महान कार्य केल्याचे गौरवोद्गार त्यांनी व्यक्त केले. मराठी साहित्य संमेलन केवळ एका भाषेपुरतं किंवा एका राज्यापुरतं सीमित नसून त्यात स्वातंत्र्यलढ्याचा गंध आहे, आणि तो महाराष्ट्राचा आणि देशाचाही सांस्कृतिक ठेवा आहे असं पंतप्रधान म्हणाले. मराठी भाषेच्या माध्यमातून भक्तीमार्गाची चळवळ उभी करुन महाराष्ट्रातल्या संतांनी समाजाला नवी दिशा दिली असं पंतप्रधान म्हणाले.

साहित्य संमेलनाच्या या उद्घाटन सोहोळ्याला स्वागताध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार, संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. रविंद्र शोभणे, साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. भाषा हे संस्कृतीचं बलस्थान आहे. भाषा ही जोडणारी गोष्ट असायला पाहिजे, तोडणारी नाही, मराठी ही जैविक भाषा आहे असं सांगत संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी मराठीचं वेगळेपण विशद केलं.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पहिलं संमेलन दिल्लीत होतं आहे ही अभिमानाची गोष्ट असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधानांचे आभार मानले.

**<u>उपराष्ट्रपती-संभाजीनगर</u>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज महाराष्ट्रातल्या छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या 65व्या दीक्षांत समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. पीएम उषा प्रकल्पातंर्गत बांधण्यात आलेल्या विद्यापीठाच्या चार इमारतींचं भूमिपूजन, तसंच संविधान जागृती वर्षाच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमाचं उद्घाटनही उपराष्ट्रपती करणार आहेत. आपल्या दौऱ्यात वेरुळ लेणी आणि घृष्णेश्वर मंदिरालाही उपराष्ट्रपती भेट देणार आहेत.

**<u>अमित शहा-जयकुमार गोरे</u>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज पुणे दौऱ्यावर असून गृह मंत्रालयाच्या पश्चिम विभागीय परिषदेची 27 वी बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा या राज्यांसह दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री, प्रशासक, वरिष्ठ मंत्री आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. आपल्या पुणे दौऱ्यात जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभालाही शहा उपस्थित राहणार आहेत.

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातल्या पुणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांना अमित शहा यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात मंजुरी पत्र वितरण तसंच राज्यातल्या 10 लाख लाभार्थ्यांना या योजनेच्या पहिल्या हप्त्याचं वितरणदेखील यावेळी करण्यात येईल. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार उपस्थित राहणार आहेत.

**पंतप्रधान-सोल**

स्कूल ऑफ अल्टीमेट लीडरशिप संमेलनातून केवळ देशातच नाही तर आंतरराष्ट्रीय पातळीवर नाव कमावणारं नेतृत्त्व तयार होईल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. पंतप्रधानांच्या हस्ते काल नवी दिल्लीत सोल लीडरशीप संमेलनाचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. राष्ट्र उभारणीसाठी नागरिकांचा विकास खूप महत्त्वाचा असून, सोल म्हणजे स्कूल ऑफ अल्टिमेट लीडरशिपची स्थापना ही विकसित भारताच्या प्रवासाच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल असल्याचं पंतप्रधान म्हणाले. भूतानचे पंतप्रधान दाशो शेरिंग तोबगे या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**ट्रम्प-झेलीन्स्की**

रशिया-यूक्रेन दरम्यान सुरू असलेलं युद्ध थांबवण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या वाटाघाटींमध्ये यूक्रेनचे अध्यक्ष वोलोदीमीर झेलीन्स्की यांची उपस्थिती महत्वाची नसल्याचं प्रतिपादन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलं आहे. युद्धाची सुरुवात रशियाने यूक्रेनवर हल्ला करून झाली हे ट्रम्प यांनी मान्य केलं, मात्र अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडन आणि यूक्रेनचे अध्यक्ष वोलोदीमीर झेलीन्स्की यांच्यावर त्यांनी युद्ध थांबवण्यात अपयशी ठरल्याचा ठपका ठेवला. दरम्यान, युक्रेनमधील अमेरिकेचे राजदूत कीथ केलॉग यांनी झेलेन्स्की यांची, धाडसी नेता अशी प्रशंसा केली आहे.

**जयशंकर**

जी-20 ने आपलं नेतृत्व टिकवून ठेवण्यासाठी संपूर्ण जागतिक आव्हानांना अचूकपणे प्रतिबिंबित केलं पाहिजे असं आवाहन परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी केलं आहे. दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग इथं काल 2025 च्या जी-20 उद्दिष्टांवरील, जी-20 सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत ते बोलत होते. सध्या अन्न, ऊर्जा आणि आरोग्य सुरक्षा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांची उभारणी आणि महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाला प्रोत्साहन देणं ही आव्हानं आहेत. तत्पूर्वी, दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग इथे जी-20 परराष्ट्र मंत्री बैठकीत डॉ. एस. जयशंकर यांनी त्यांचे चिनी समकक्ष वांग यी यांच्याशी चर्चा करून द्विपक्षीय संबंधांमधील विकासाचा, आणि सीमावर्ती भागातल्या शांततेबाबत आढावा घेतला.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या 'मन की बात' कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 119वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, आकाशवाणीच्या वेबसाइटवर तसंच न्यूजऑन ए आय आर या मोबाईल ॲपवरुन प्रसारित केला जाईल. आकाशवाणीवरून हिंदी प्रसारणानंतर हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्येही लगेचच प्रसारित केला जाईल.

**रिझर्व्ह बँक-दंड**

कर्जविषयक माहिती देण्यासंबंधीच्या निर्देशांचं पालन न केल्याबद्दल काही वित्तीय संस्थांना रिझर्व्ह बँकेने काल दंड ठोठावला. यात सिटीबँकेला 29 लाख रुपये, आशिर्वाद मायक्रो फायनान्स कंपनीला सहा लाख वीस हजार आणि जेएम फायनान्शियल होम लोन लिमिटेडला एक लाख पन्नास हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. वेगवेगळ्या श्रेणीतील कर्जदारांकडून वेगवेगळे व्याजदर आकारण्याची कारणे न देणे, आणि नियामक अनुपालनातील त्रुटींमुळे ही कारवाई करण्यात आल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

**न्यु इंडिया बँक घोटाळा**

न्यु इंडिया सहकारी बँकेत 122 कोटी रुपयांचा घोटाळा केल्याप्रकरणी आरोपी असलेल्या हितेश मेहता आणि धर्मेश पौन यांच्या पोलिस कोठडीत, मुंबई दंडाधिकारी न्यायालयाने 28 फेब्रुवारी पर्यन्त वाढ केली आहे. बँकेत 122 कोटी रुपयांचा अपहार केल्याचा या दोघांवर आरोप आहे. दरम्यान, मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी अभिमन्यु भोआन यांना काल अटक केली.

**महाराष्ट्र भरती**

मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला कर्मचारी भरतीबाबतच्या प्रस्तावांवर त्वरित निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. न्यायाधीश ए. एस. गडकरी आणि कमल खटा यांच्या खंडपीठाने कर्मचाऱ्यांच्या कमतरतेच्या मुद्द्यावर स्वेच्छेने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना काल या सूचना दिल्या. केवळ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे हे कमी मनुष्यबळाचा सामना करण्यासाठी पुरेसं नाही; तर कर्मचाऱ्यांना आधुनिक न्यायालयीन आवश्यकता पूर्ण करण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या पात्र कर्मचाऱ्यांची गरज असल्याचं मत न्यायालयानं व्यक्त केलं. राज्याला केवळ सध्याच्या कर्मचाऱ्यांच्या कमतरतेसाठीच नव्हे तर भविष्यातील गरजांसाठीही भरती करण्याचे निर्देश न्यायालयानं दिले आहेत.

**डेफजॉब फेअर**

वाणी आणि श्रवण अक्षमतेवर काम करणाऱ्या अली यावर जंग राष्ट्रीय संस्थेच्या वतीने आज त्यांच्या मुंबई केंद्रामध्ये सकाळी 10 ते दुपारी 4 या वेळेत डेफ लाईव्हलीहूड फेअर 2025 चं आयोजन करण्यात आलं आहे. जागतिक सामाजिक न्याय दिवसानिमित्त आयोजित केलेला हा नोकरी मेळावा भारतीय सांकेतिक भाषेतील दुभाषी म्हणून नोकरी शोधणाऱ्यांसाठी मोलाचा ठरणार आहे असं संस्थेच्या निवेदनात म्हटलं आहे. कर्णबधिर समुदायासाठी समान रोजगार, आर्थिक स्वातंत्र्य आणि समावेशक कार्यस्थळ धोरणांना प्रोत्साहन देण्यासाठी हा मेळावा तयार केला आहे. हा उपक्रम बडोदाच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे.

**महाकुंभ**

येत्या 26 फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीला होणाऱ्या महाकुंभ मेळ्याच्या सांगता समारंभाची जय्यत तयारी सुरू आहे. उत्तर प्रदेशचे मुख्य सचिव मनोज कुमार सिंह आणि पोलिस महासंचालक प्रशांत कुमार यांनी प्रयागराज इथे जाऊन महाकुंभ मेळ्याच्या या शेवटच्या दिवसाच्या तयारीचा आढावा घेतला. आतापर्यंत 59 कोटी 19 लाखांहून अधिक भाविकांनी महाकुंभात पवित्र स्नान केल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.